**फौजदारी प्रकिंया संहितेचे कलम २९९ प्रमाणे साक्षीदाराची साक्ष**

**नि.फौ.ख.क्र.७४/२०१७**

**सरकार वि. विनोद**

**निशाणी क्र.०८**

**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक ३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – रामभाऊ दशरथ ठवकर

वय – ७६ वर्ष, व्यवसाय – काही नाही

राहणार – इंदीरा नगर कन्हान, ता.पारशिवणी, जि.नागपूर.

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. एम.एम.पंचारीया यांच्यातर्फे**

घटना नऊ वर्षापूर्वी सायंकाळी ७.०० वाजताच्या सुमारास माझ्या घरासमोर घडली होती. त्यादिवशी माझी सुन भावना रोडवर गाडी लावून उभी होती. त्यावेळी आरोपी तेथे आला व त्याने तिचा हात पकडून एक थापड मारली. त्यामुळे मी तिला वाचविण्यासाठी गेलो असता त्याने मला धक्का मारला. त्यामुळे मी खाली पडलो. त्यानंतर माझा मुलगा श्रीकांत आम्हाला वाचविण्यासाठी आला असता आरोपीने त्याला सुध्दा धक्का दिला. त्यामुळे तो खाली पडला. त्यानंतर आरोपी माझ्या मुलाच्या पायावर बसला. त्यामुळे माझ्या मुलाचा पाय फ्रॅक्चर झाला. त्यानंतर आम्ही आरोपीविरुध्द पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. पोलीसांनी माझे बयान घेतले होते. आरोपी सध्या कुठे राहतो याची मला कल्पना नाही. घटनेला बराच कालावधी झाल्यामुळे मला प्रस्तुतची केस पुढे चालवायची नाही.

**सरतपास संपला.**

**प्रस्तुतच्या खटल्यात आरोपी फरारी असल्यामुळे आरोपीच्या अनुपस्थितीत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे साक्ष नोंदविण्यात आलेली आहे. त्यामुळे, आरोपीतर्फे उलटतपास नाही.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

RAJESH RAMESHRAO SHEREKAR

Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2026.04.20 13:49:10 +0530

कामठी

दिनांक २०.०४.२०२६

(रा.र. शेरेकर)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

कोर्ट नं.२, कामठी.